Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१२ /२०२३

**विषय - लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सांगता व कृतज्ञता पर्व**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी व विद्यार्थ्यांना आदेशानुसार कळविण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त कोल्हापूर जिल्हा प्रशासनामार्फत दि. ६ ते १४ मे २०२३ या कालावधीत **'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सांगता व कृतज्ञता पर्व २०२३'** या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत राजर्षींच्या स्मृतिदिनी म्हणजेच शनिवार, दि. ६ मे २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता **१००** सेकंद स्तब्धता व मौन पाळून अभिवादन /आदरांजली वाहण्यात येणार आहे.

**या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिवादन कार्यक्रमासाठी शनिवार दि. ६ मे २०२३ रोजी सकाळी ठीक ९.४५ वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात एनएसएस विभागाने संबधिताकरिता पूर्वनियाजित केलेल्या ठिकाणी उपस्थित राहून १०० सेंकद काटेकोरपणे स्तब्धता/मौन पाळावे. यादरम्यान कोणीही मोबाईलचा वापर करू नये व छायाचित्रण करू नये आणि कोणतीही हालचाल करू नये.**

तसेच, जिल्हा प्रशासनामार्फत दि.०६ ते १४ मे, २०२३ दरम्यान 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सांगता व कृतज्ञता पर्व २०२३' या उपक्रमाअंतर्गत छत्रपती शाहू मिल, बागल चौक, कोल्हापूर येथे आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांना विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनीं यांनी उपस्थित रहावे. सोबत सदर कार्यक्रमांची रूपरेषा जोडली आहे.

**प्र. कुलसचिव**

**जावक क्रमांक आस्थापना /** ८४४

**दिनांक :-** 04 MAY 2023

**प्रति,**

१ .सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, चिफ रेक्टर व रोक्टर सर्व वसतिगृहे, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

२.मा.कुलगुरु,मा.प्र-कुलगुरु,मा.कुलसचिव,मा.संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३.मा.संचालक, क्रीडा अधिविभाग/ राष्ट्रीय सेवा योजना विभाग

४.विभागप्रमुख, सुरक्षा विभाग

५.विभागप्रमुख, अभियांत्रिकी विभाग

६.अधीक्षक, मुलांचे व मुलींचे सर्व वसतीगृहे - सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनीना याबाबत अवगत करून सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनी उपस्थित राहतील यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

७. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

➢ **विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज

# कृतज्ञता पर्व

वंदन लोकराजाला २०२३

## जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

आयोजित

# स्मृती शताब्दी वर्ष सांगता... मनात सदैव कृतज्ञता !

## प्रस्तावित कार्यक्रम रुपरेषा

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ मे, २०२३ | सकाळी ०९.३० सकाळी १०.०० | छत्रपती शाहू समाधी स्थळ मानवंदना<br>राजर्षी शाहू महाराजांना १०० सेकंद स्तब्ध उभे राहून मानवंदना | छत्रपती शाहू समाधी स्थळ |

**शनि. दि. ०६ मे ते रवि. १४ मे २०२३ छत्रपती शाहू मिल येथील कार्यक्रम**

### ०६ मे, २०२३

| | |
|---|---|
| सकाळी १०.३० | स्मृती शताब्दी सांगता कार्यक्रम व<br>**कृतज्ञता पर्व २०२३ उद्घाटन,** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | चित्रपट : **"छत्रपती शिवाजी" १९५२**<br>दिग्दर्शक - श्री. भालजी पेंढारकर |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | **लोककला व स्थानिक पारंपारिक कलाकार** |

### ०७ मे, २०२३

| | |
|---|---|
| सकाळी ९.०० ते ०५.०० | शाहू महाराज यांना कोल्हापूरातील<br>**मान्यवर चित्र शिल्पकारांकडून मानवंदना** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | चित्रपट : **"माणूस" १९३९**<br>दिग्दर्शक - श्री. व्ही. शांताराम |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | **"भूपाळी ते भैरवी" महाराष्ट्राचा लोकजागर** |

### ०८ मे, २०२३

| | |
|---|---|
| सकाळी १०.३० ते १२.३० | इ. पाचवी ते दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी<br>**प्रा. राजेंद्र हंक्कारे यांची कॅलिग्राफी कार्यशाळा** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | **चित्रपट : "ध्यासपर्व" २००१**<br>दिग्दर्शक - अमोल पालेकर |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | **राजर्षी शाहू महाराजांना शाहीरी मुजरा**<br>(शाहिरी पोवाडा) |

### ०९ मे, २०२३

| | |
|---|---|
| सकाळी १०.३० ते १२.३० | इ. पाचवी ते दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी<br>**श्री. मंदार वैद्य यांचे पेपरक्राफ्ट कार्यशाळा** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | **चित्रपट : "गांधी" १९८२**<br>दिग्दर्शक - रिचर्ड अ‍ॅटनबेरो |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | वारसा समृध्द कलेचा... **महाराष्ट्राची लोकधारा** |

### 10 मे, 2023

| | |
|---|---|
| सकाळी १०.३० ते १२.३० | इ. पाचवी ते दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी<br>**श्री. सत्यजित निगवेकर यांची माती शिल्प कार्यशाळा** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | **चित्रपट : "महातमा फुले" १९५४**<br>दिग्दर्शक - श्री. प्र. के. अत्रे, |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | **शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीत** |

### ११ मे, २०२३

| | |
|---|---|
| सकाळी १०.३० ते १२.३० | इ. पाचवी ते दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी<br>**श्री. गौरव काईंगडे यांचे मातीकाम (पॉटरी) कलेबद्दलचे प्रशिक्षण कार्यशाळा** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | **चित्रपट : "आनंदी गोपाळ" २०१९**<br>दिग्दर्शक - श्री. समीर विद्वांस |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | **राजा माझा रयतेचा** |

### १२ मे, २०२३

| | |
|---|---|
| सकाळी १०.३० ते १२.३० | इ. पाचवी ते दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी<br>**श्री. चेतन चौगुले यांची चित्ररेखांकन आणि रंगकाम कार्यशाळा** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | **चित्रपट : "डॉ. बाबासाहेब आंबेडकर" २०००**<br>दिग्दर्शक - श्री. जब्बार पटेल |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक नागपूर, आयोजित<br>**विविध राज्यातील लोक कलाकारांकडून त्यांच्या कलेद्वारे राजर्षी शाहू महाराजांना मानवंदना** |

### १३ मे, २०२३

| | |
|---|---|
| सकाळी १०.३० ते १२.३० | इ. पाचवी ते दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी<br>**श्री. भाऊसो पाटील यांचे अ‍ॅनिमेशन आणि कार्टून फिल्म निर्मिती आणि त्यातील चित्रकलेचे योगदान याबद्दल प्राथमिक माहिती...कार्यशाळा** |
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | **चित्रपट : "सिंहासन" १९७९**<br>दिग्दर्शक - श्री. जब्बार पटेल |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक नागपूर, आयोजित<br>**विविध राज्यातील लोक कलाकारांकडून त्यांच्या कलेद्वारे राजर्षी शाहू महाराजांना मानवंदना** |

### १४ मे, २०२३

| | |
|---|---|
| दुपारी ०२.०० ते ०५.०० | **चित्रपट : "देवकीनंदन गोपाला"**<br>दिग्दर्शक - श्री. राजदत्त |
| सायं. ०६.०० ते ०९.०० | दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक नागपूर, आयोजित<br>**विविध राज्यातील लोक कलाकारांकडून त्यांच्या कलेद्वारे राजर्षी शाहू महाराजांना मानवंदना** |

**दिनांक ०६ मे ते १४ मे, २०२३ पर्यंत रोज सकाळी १० ते रात्री १० पर्यंत शाहू मिल येथे... शाहू महाराजांचे फोटो प्रदर्शन, जुन्या शस्त्रांचे, नाण्याचे प्रदर्शन, कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांबद्दल माहिती देणारे, कोल्हापूरच्या औद्योगिक, शिक्षण, आरोग्य, क्रीडा इत्यादी क्षेत्रांचा विकास दर्शविणारी व विविध शासकीय योजनांची माहिती देणारी दालने तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील प्रामुख्याने गूळ, कापड, चप्पल, चांदी व सोन्याचे दागिने, माती व बांबूच्या वस्तु, घोंगडी, जान, दुग्ध उत्पादने, खाद्य पदार्थ, तांदूळ, मिरची, मध, काजू, रेशीम, तृणधान्य व वन उत्पादने आणि विशेष म्हणजे आंबा महोत्सव, प्रसिद्ध वस्तू, विविध उत्पादने यांचे प्रदर्शन व विक्री शाहू मिल येथे आयोजित केली आहे.... हे सर्व प्रदर्शन व दालने लोकांसाठी खुली असतील.**